# मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था

उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (टीबी) यांचे कार्यालय, पहिला माळा,
बावलावाडी म्युनिसिपल कार्यालय, व्होल्टास हाऊससमोर, डॉ. बी. आंबेडकर रोड,
चिंचपोकळी (पू.), मुंबई- 400012.
टेलि: 23726248 फॅक्स: 23726229

राष्ट्रीय क्षयरोग शहरी आरोग्य अभियानांअर्तगत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी करार तत्वावर खालील पदांसाठी उमेदवारांकडून अर्ज दिनांक २२/१२/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत अर्जाची नमुना प्रत मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध राहतील.

## राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमासाठी जाहिरात

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव असल्यास प्राधान्य | एकत्रित मानधन (रुपये प्रतिमाह) | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | औषध निर्माता | २० | Diploma in बी. फार्मसी/ डी. फार्मसी, आणि १ वर्षाचा अनुभव | 17,000/- | अ.जा.-03<br>अ.ज-1,<br>विजाअ-01,<br>भ.ज. (ब)-01<br>भ.ज. (क)-01,<br>इमाव-04<br>खुला- 09 |
| 2. | एक्स रे तंत्रज्ञ | ०१ | Diploma in एक्स-रे तंत्रज्ञान, आणि १ वर्षाचा अनुभव. | 17,000/- | खुला- 1 |

**अटी व शर्ती**

1. उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरूपाची असून नियुक्ती दि. ०५.११.२०२१ पर्यंत राहील तसेच पुनर्नियुक्ती करण्यात येईल.
2. जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरूपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. सदरची कंत्राटी पदे ही जाहिरातीत नमूद महानगरपालिकाअंतर्गत कार्यक्षेत्रात असतील.
3. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
4. वरील पदे भरण्याकरिता अटी - 1. वयोमर्यादा खुला 38, 2. राखीव 43, 3. NHM कर्मचारी 5 वर्षे शिथिल, 4. निवृत्ती शासकीय अधिकारी / विशेषतज्ञ 70 वर्षे व कर्मचारी 65 वर्षापर्यंत.
5. उपरोक्त कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
6. सेवानिवृत्ती विशेषतज्ञ/ कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरिता मानधन राज्य स्तरावरून प्राप्त विहित मार्गदर्शक सूचनांनुसार मोजमाप करून अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
7. जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था यांनी राखून ठेवले आहेत.
8. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. विहित शैक्षणिक पात्रता नसल्यास सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
9. निवड प्रक्रियातील पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी तसेच मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेस येईल व तद्नंतर त्याच दिवशी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील व निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
10. विशेषतज्ञ/ कर्मचारी या पदांकरिता शासकीय सेवेतून सेवानिवृत्ती/ स्वेच्छा सेवानिवृत्ती विशेषतज्ञ / अधिकारी या पदांकरिता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रूजू झालेल्या दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपूर्ण माहिती अर्जामध्ये नमूद करावी.
11. शासकीय, निम शासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.
12. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.
13. भरती प्रक्रिया स्थगित करणे/ रद्द करणे/ पदभरीत प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.
14. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज **''मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्था, बावलावाडी, मुख्य कार्यालय, बाबासाहेब आंबेडकर रोड, चिंचपोकळी, मुंबई-400012''** येथे देण्यात यावे.
15. सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वर्षभरात भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.
16. खुला प्रवर्गासाठी 150/- रुपयांचा व राखीव प्रवर्गासाठी 100/- रुपयांचा मागणी धनाकर्ष (Demand Draft) **"Mumbai District TB Control Society"** यांच्या नावे काढण्यात यावा. यांच्या नावे धनादेश नसल्यास उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

1. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका.
2. जातीचे प्रमाणपत्र.
3. शाळा सोडल्याचा दाखला/ जन्मतारखेचा दाखला.
4. प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे.
5. पासपोर्ट आकाराचे 2 फोटो.
6. शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला.
7. आधार कार्ड.
8. पॅन कार्ड.

सही/-
सदस्य सचिव
मुं.जि.क्ष.नि.सं.

**PRO/ 1252/ADV/ 2020-21**